महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०४ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०७३ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# ठाणे मेट्रोला आर्थिक गती

## मंत्रिमंडळ बैठकीत कर्जास मंजुरी !



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे शहरातील सार्वजनिक वाहतुकीला पर्याय म्हणून ठाणे महापालिकेने आखलेल्या १२ हजार २०० कोटींच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्पास केंद्र सरकारने काही महिन्यांपुर्वी हिरवा कंदील दाखविला होता. त्यापाठोपाठ आता या प्रकल्पाकरीता कर्ज घेण्यास राज्याच्या मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून यामुळे या प्रकल्पाला गती मिळाली आहे.

ठाणेकरांना सार्वजनिक वाहतुकीचा आणखी एक पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी ठाणे महापालिकेने १२ हजार २०० कोटींचा अंतर्गत मेट्रो प्रकल्प आखला होता. या बहुचर्चित प्रकल्पास केंद्र सरकारने अखेर हिरवा कंदील दाखविला होता. या प्रकल्पाचा आराखडा महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महामेट्रो) ने तयार केला असून, ठाणे महापालिकेच्या सहकार्याने प्रकल्प कार्यान्वित होणार आहे. या मेट्रोची सुरूवात २०२९ पर्यंत होणार असून या प्रकल्पामुळे ठाणेकरांचा प्रवास अधिक सुखकर आणि गतिमान होणार आहे.

शहरातील अंतर्गत भागासाठी पालिकेने सहा डब्यांची मेट्रो प्रकल्पाची आखणी केली होती. परंतु मोठ्या शहरांमध्ये सहा डब्यांची मेट्रो तीन मिनिटांच्या अंतराने चालविण्यात येते. यामुळे ठाण्यात तीन डब्यांची मेट्रो दीड मिनिटांच्या अंतराने चालवावी अशी सूचना केंद्राने केली होती. परंतु उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असतानाच त्यांनी ठाण्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर सहा डब्यांची मेट्रो गरजेची असल्याचे मत मांडले होते. अखेर केंद्र सरकारने हा मुद्दा मान्य करत सहा डब्यांच्या मेट्रोवर शिक्कामोर्तब करून प्रकल्पाला हिरवा कंदील दिला होता.

राज्य मंत्रीमंडळाची बैठक बुधवारी पार पडली. या बैठकीत ठाणे शहरातील अंतर्गत मेट्रो संदर्भात महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ठाणे अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प यासह पुणे आणि नागपूर मेट्रोच्या विविध टप्प्यांसाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य सहाय्यित कर्जासाठी आकस्मिक दायित्व स्वीकारण्यास राज्य मंत्रीमंडळाने बैठकीत मान्यता दिली आहे. तसेच प्रकल्पांचे करारनामा, कर्ज करारनामा आणि दुय्यम वित्तीय करारनामे करण्यासही मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे ठाणे मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीला आता अधिक वेग येणार असून, २०२९ पर्यंत मेट्रो मार्ग सुरु होण्याची अपेक्षा आहे. एकूण २९ किमी लांबीच्या या प्रकल्पात २६ किमी लांबीचा मार्ग हा उन्नत असून ३ किमीचा मार्ग हा भूमिगत आहे. प्रकल्पांर्गत एकूण २२ स्थानके असून त्यातील २ स्थानके भूमिगत असून एक स्थानक ठाणे रेल्वे स्थानकाला जोडले जाणार आहे. अन्य स्थानके शहरातील मेट्रो कॉरिडॉरला जोडली जाणार आहेत. अंदाजे ७.६१ लाख प्रवाशांना दररोज या मेट्रो रेल्वे सेवेचा लाभ होणार असून २०२९ पर्यंत मेट्रोची सुरुवात होईल. ठाण्यातील नौपाडा, वागळे इस्टेट, डोंगरीपाडा, हिरानंदानी इस्टेट, कोलशेत, साकेत आदी भाग या मेट्रोने जोडला जाणार असल्याने प्रवाशांचा गतिमान आणि सुरक्षित प्रवास होणार आहे.



## लालबागचा राजासाठी भाविकांची रेटारेटी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** लालबाग परिसरात 'मुंबईचा राजा आणि लालबागचा राजा'च्या दर्शनासाठी केवळ मुंबईच नव्हे तर, राज्याच्या कानाकोपऱ्यातून लोक येत असतात. या राजाच्या दरबारी सेलेब्रिटीही हजेरी लावतात. आठव्या दिवशी दिवशी 'लालबागचा राजा'च्या दर्शनासाठी गणेशभक्तांनी अलोट गर्दी केली होती. यामध्ये सामान्य लोकांनी रांगेतून प्रवेश करण्यासाठी रेटारेटी करत होते. तर व्हीआयपी गेटवर आमदार पत्र धारकांची झुंबड उडाली होती. दीड, अडीच, पाच आणि सात दिवसांचे गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर मुंबईकर गणपती दर्शनासाठी बाहेर पडले आहेत. दरवर्षी 'लालबागचा राजा'च्या दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागतात, त्या गर्दीतही राजाचे मनमोहक रूप भाविक आपल्या डोळ्यांत साठवतात.






### गणेशोत्सवानिमित्त भाजपा प्रदेशाध्यक्ष

## रवींद्र चव्हाणांनी घेतले महेश गायकवाड यांच्या बाप्पांचे दर्शन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बातमीदार**

**कल्याण :** कल्याण पूर्व भागात राजकीय दबदबा असलेल्या माजी नगरसेवक महेश गायकवाड यांची भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी गणपती दर्शनाचे निमित्त साधून माजी नगरसेवक महेश गायकवाड यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली.

काही दिवसापूर्वीच महेश गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. भाजप प्रदेशाध्यांनी गायकवाड यांची त्यांच्या घरी येऊन भेट घेतल्याने अनेकांचे डोळे विस्फारले आहेत.

कल्याण पूर्वेचे भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांनी हिललाईन पोलीस ठाण्यात जमीन वादातून शिंदे शिवसेनेचे माजी नगरसेवक महेश गायकवाड यांच्यावर दोन वर्षापूर्वी गोळीबार केल्याच्या घटनेपासून कल्याण पूर्वेत भाजप आणि महेश गायकवाड यांच्यात दुहीचे वातावरण आहे. महेश गायकवाड शिंदे शिवसेनेतील कल्याण पूर्वेचे शिलेदार म्हणून ओळखले जात होते. युती म्हणून ते कल्याण पूर्वेत शिवसेना, भाजपच्या कार्यक्रमात असायचे. पण, भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांनी गोळीबार केल्यापासून महेश गायकवाड यांनी भाजपपासून दूर राहण्याची भूमिका घेतली.

स्थानिक राजकीय हालचालींमुळे भाजप आणि महेश गायकवाड यांच्यात वितुष्ट होते. मंगळवारी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी गणपती दर्शनाचे निमित्त साधून कल्याण पूर्वच्या भाजप आमदार सुलभा गायकवाड काय म्हणतील याचा विचार न करता महेश गायकवाड यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. या दर्शन राजनितीमधून महेश आणि भाजपमधील दरी दूर करण्याचा प्रयत्न आगामी पालिका निवडणुकांच्या तोंडावर कमी करण्याचा प्रयत्न चव्हाण यांनी केला असल्याचे समजते.

## नवी मुंबई बाजार समितीवर प्रशासक

### संचालक मंडळ बरखास्त




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) संचालक मंडळाची मुदत ३१ ऑगस्ट रोजी संपुष्टात आली होती. त्यानंतर नवीन निवडणूक होणार, मुदतवाढ दिली जाणार की थेट राष्ट्रीय बाजार समितीकडे बाजाराचा कारभार जाणार, याबाबत चर्चेला वेग आला होता. या पार्श्वभूमीवर पणनमंत्री जयकुमार रावल यांनी संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पणन संचालक विकास रसाळ यांनी प्रशासक म्हणून रुजू होऊन मुंबई एपीएमसीचा कारभार हाती घेतला आहे.

एपीएमसी निवडणुकीबाबत गेल्या काही महिन्यांपासूनच अनिश्चितता होती. डिसेंबर २०२३ मध्ये सभापती-उपसभापती पदाच्या निवडणुकीची घोषणा झाली होती; मात्र कोरम न मिळाल्याने जानेवारी २०२४ मध्ये ती प्रक्रिया स्थगित करण्यात आली. त्यानंतर काही संचालक अपात्र ठरल्याने मंडळाची कार्यक्षमता घटली आणि कारभार अडखळला होता. परिणामी, शासनाकडून बाजार समितीवर प्रशासक नेमण्याचा निर्णय घेण्यात आला.

> **पणनमंत्री आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही मुंबई एपीएमसीचा कारभार सांभाळणार आहोत. शिवाय मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती आणि काही बाजार समित्यांना राष्ट्रीय बाजार समिती म्हणून घोषित करण्यासाठी राज्य सरकार सकारात्मक असून, याबाबत कायदेशीर प्रक्रिया करण्याचे काम सुरू आहे.**
>
> • विकास रसाळ, प्रशासक तथा पणन संचालक

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने कायम चर्चेत राहिली आहे. स्वच्छतागृहांबाबत गैरव्यवहार, सेस चोरी, एफएसआय घोटाळा, नाले सफाईत गैरव्यवहार आदींचा यात समावेश आहे. त्यात संचालक मंडळाची निवडणूक हादेखील मुंबई एपीएमसीत मोठ्या चर्चेचा विषय ठरला होता. संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर मुंबई एपीएमसीसमोर दोनच पर्याय उरले होते. पहिला म्हणजे तात्पुरत्या स्वरूपात प्रशासक नेमणे आणि दुसरा बाजार समितीला राष्ट्रीय बाजार समितीच्या अखत्यारीत समाविष्ट करणे. अखेरीस शासनाने पहिला पर्याय स्वीकारत प्रशासक नेमला आहे.

## बदलापूर प्रभाग रचनेवर हरकतींचा पाऊस



### ८८ तक्रारींवर आज सुनावणी

हरकतींवर सुनावणी झाल्यानंतर त्यांचा अभिप्राय नगर विकास विभागाकडे पाठवण्यात येईल. त्यानंतर वरिष्ठ अधिकारी सर्व आक्षेप आणि सूचना तपासून आवश्यक ते बदल करून अंतिम प्रभागरचना जाहीर करणार असल्याची माहिती मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी दिली आहे. तसेच या हरकतींवर सुनावणी झाल्यानंतर आमदार किसन कथोरे आपली पुढची भूमिका स्पष्ट करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे उद्याच्या होणाऱ्या सुनावणीकडे संपूर्ण बदलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. ३ (बातमीदार)**

काही दिवसांपूर्वी स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी बदलापूरच्या प्रभागरचना आराखड्यात भ्रष्टाचार झाल्याचा मोठा आरोप केल्यानंतर प्रारूप प्रभागरचनेच्या आराखड्यांवर अनेक तक्रारी दाखल झाल्या आहेत. बदलापूर पालिका प्रभागरचनेच्या आराखड्याविरोधात एकूण ८८ तक्रारी दाखल झाल्या असून, यात प्रभाग क्रमांक तीन व चार या प्रभागात सर्वाधिक १६ तक्रारी दाखल झाल्या आहेत. या सगळ्या तक्रारींवर पालिकेत मुख्याधिकारी दालनात आज, गुरुवारी (ता. ४) सुनावणी होणार असून, याबाबतीत काय निकाल लागतो याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, प्रारूप प्रभागरचना आराखडा तयार केला. आराखडा प्रसिद्ध होण्यापूर्वीच वादात अडकला होता. ही प्रभागरचना चुकीच्या पद्धतीने झाली असून, रस्ते, रेल्वे सीमा, नदी या सगळ्या नियमांना बगल देऊन, प्रभागरचना आराखडा तयार केला असल्याचा आरोप आमदार किसन कथोरे यांनी केला आणि हा प्रभागरचना आराखडा तयार करण्यासाठी पालिकेत मुख्याधिकारींनी भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यानंतर या प्रारूप प्रभागरचनेच्या आराखड्याच्या विरोधात तक्रारी दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली होती. या मुदतीपर्यंत पालिकेत एकूण ८८ तक्रारी दाखल झाल्या असून, प्रभाग क्रमांक तीन व चार या दोन प्रभागांमध्ये सर्वाधिक १६ तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

प्रभाग क्रमांक तीन हा विचित्र पद्धतीने तयार केल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे, तर प्रभाग क्रमांक दोन हा बदलापूर पश्चिम येथील मोहनानंद नगर येथून सुरू होऊन, उल्हास नदी ओलांडून थेट एरंजाड, सोनिवली आणि बदलापूर गावाच्या सीमेपर्यंत सहा किमी अंतरापर्यंत जातो. पालिकेत दाखल केलेला हरकतींवर उद्या गुरुवारी (ता. ४) कल्याणचे उपविभागीय अधिकारी व प्राधिकृत अधिकारी विश्वास गुजर यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांच्या उपस्थितीत सुनावणी प्रक्रिया होणार आहे.

## ठाणे महापालिकेच्या भरती प्रक्रीयेला मुदत वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे महापालिका आस्थापनेवरील प्रशासकीय सेवा, लेखा सेवा, तांत्रिक सेवा, अग्निशमन सेवा, शिक्षण सेवा, सार्वजनिक आरोग्य सेवा, वैद्यकीय सेवा, निमवैद्यकीय सेवा आदी सेवांमधील एकूण १७७३ पदे भरण्यात येणार आहेत. या पदांच्या भरतीसाठी २ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत पालिकेने दिली होती. मात्र, काही कारणास्तव पालिकेने ही मुदत वाढविली असून यामुळे आता १७ सप्टेंबरपर्यंत इच्छुकांना भरतीसाठी अर्ज दाखल करता येणार आहेत.

ठाणे महापालिकेची स्थापना १९८२ मध्ये झाली असून ही 'ब' वर्ग महापालिका आहे. ठाणे महापालिकेत शिक्षण मंडळासह ९०८८ तर परिवहन सेवेत २ हजार ६०० कर्मचारी आहेत. तसेच २५०० कंत्राटी कामगार आहेत. दरम्यान, अर्ज दाखल करण्याच्या एक दिवस आधी आणि त्याआधीही काही तांत्रिक कारणामुळे अनेकांना अर्ज दाखल करता आले नाहीत. त्यामुळे पालिकेने अर्ज दाखल करण्यासाठी आता आणखी १५ दिवसांची मुदत वाढ देऊन १७ सप्टेंबरपर्यंत अर्ज दाखल करण्यास वेळ दिली आहे.

## केडीएमसीत बदल्यांचे संकेत ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण : ता. 3 कल्याण-डोंबिवली पालिकेत विविध विभागात काही ठरावीक कर्मचारी वर्षानुवर्षे ठाण मांडून आहेत. बदलीचे आदेश काढूनही राजकीय वरदहस्त, प्रभाग अधिकाऱ्यांचा हात यामुळे हे कर्मचारी आपल्या खूर्चीतून हलत नाहीत, मात्र आता अशा पालिका कर्मचाऱ्यांना बदलीची वाट धरावी लागणार आहे. सहा वर्षांपासून अधिक काळ एकाच विभागात कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची माहिती सामान्य प्रशासन विभागाने प्रभाग स्तरावरून मागवली आहे.**


पालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशावरून सामान्य प्रशासन विभागाने प्रत्येक प्रभागात, विविध विभागांतून कर्मचाऱ्यांची माहिती मागवली आहे. पालिकेतील काही कर्मचारी एकाच विभागात एकाच पदावर, खुर्चीवर वर्षानुवर्षे ठाण मांडून आहेत. त्यामुळे त्या विभागात त्या कर्मचाऱ्यांची हक्कदारी तयार झाली आहे. काही कर्मचारी नोकरीला लिपिक म्हणून एका विभागात लागल्यानंतर त्याच विभागात ते वरिष्ठ लिपिक, अधीक्षक, अतिरिक्त आयुक्तपदापर्यंत मजल मारत गेले आहेत. अशा कर्मचाऱ्यांचे बहुतांश ठेकेदार, विकसक, मध्यस्थ यांच्याशी साटेलोटे निर्माण झाले आहेत. या कर्मचाऱ्यांमुळे पालिकेत गैरव्यवहार वाढत आहेत. दरवर्षी पालिकेतील दोन ते तीन कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांच्या जाळ्यात सापडतात. गेल्या २५ वर्षातील अशा लाचखोरांची एकूण संख्या सुमारे ५८ झाली आहे.

> **पालिका आयुक्त गोयल यांनी सामान्य प्रशासन विभागाला एकाच विभागात सहा वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती संकलित करण्याचे आदेश दिले आहेत. या हालचालींमुळे पालिकेच्या विविध विभागात वर्षानुवर्षे ठाण मांडून असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या अटळ आहेत, अशी चर्चा सुरू झाली आहे.**

## मराठा आरक्षणाच्या जीआर विरोधात कोर्टात जाणार – मंत्री छगन भुजबळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्य सरकारने मराठा आरक्षणावर काढलेल्या जीआरवर त्यांचेच मंत्री छगन भुजबळांनी नाराजी व्यक्त केली आहे. ओबीसी कार्यकर्त्यांनी राज्यभर जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना निवेदन द्यावं आणि ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नये अशी मागणी करावी असं आवाहन छगन भुजबळांनी केलं. सरकारच्या या जीआरवर आम्हाला संभ्रम आहे, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागत असेल तर त्या विरोधात आम्ही न्यायालयात जाऊ असंही छगन भुजबळ म्हणाले. मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा नवा जीआर काढला. त्यामध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या गोष्टीला ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शवला. राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात मंत्री छगन भुजबळांनीही नाराजी व्यक्त केली आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीवरही बहिष्कार टाकल्याचं दिसून आलं.



**चार दिवसात न्यायालयात जाऊ**

छगन भुजबळ म्हणाले की, या जीआर बाबत अद्याप संभ्रम आहे. याबाबत आमच्या नेत्यांनी आणि अभ्यासकांनी, राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी निवेदनं दिली आहेत. काही ठिकाणी ओबीसी कार्यकर्त्यांनी उपोषण सुरू केले आहेत. अनेक कायदेतज्ज्ञ, वकील आणि इतरांशी चर्चा करून याची माहिती घेत आहोत. जर आवश्यक असेल तर चर्चा करून येत्या चार दिवसात त्या विरोधात न्यायालयात जाऊ.

या जीआरच्या विरोधात न्यायालयात जाण्याची आमची तयारी असून त्यासाठी ज्या कागदपत्रांची जुळवाजुळवी करावी लागेल ती आम्ही करू असं छगन भुजबळ म्हणाले. राज्यातील कार्यकर्त्यांनी त्या-त्या ठिकाणच्या जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांना ओबीसींच्या हक्कांवर गदा येऊ देऊ नये अशी निवेदनं द्यावीत. आपले म्हणणे शांतपणे मांडावं. या व्यतिरिक्त जर कुणी उपोषण करत असेल किंवा इतर काही मार्ग पत्करत असेल तर त्या गोष्टी तूर्तास थांबवाव्यात असं भुजबळ म्हणाले.

**भुजबळांची बैठकीला दांडी**

मुंबईतल्या मराठा आंदोलनामुळे उडालेली धूळ खाली बसत नाही, तोच आता राज्यभरातील ओबीसी समाज आक्रमक झाल्याचं दिसतंय. यातील सर्वांत मोठे हिरो ठरले ते छगन भुजबळ. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी ते सह्याद्री अतिथीगृहावर पोहोचले खरे, मात्र बैठकीत काही सहभागी झाले नाहीत. राष्ट्रवादीच्या मंत्रिमंडळपूर्व बैठकीला हजेरी लावून ते निघून गेले. त्यांना मंत्रिमंडळ बैठकीला दांडी मारण्याचं नेमकं कारण विचारण्याचा प्रयत्न माध्यमांनी केला खरा, मात्र भुजबळ काहीही न बोलता निघून गेले. त्यामुळे मग ते नाराज असल्याची आणखीनच चर्चा रंगली.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी मुंबईत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उद्या, ४ सप्टेंबरला नवी मुंबईत येणार आहेत. पंतप्रधान नवी मुंबईत येणार असल्याने प्रशासनासह भाजपच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नवी मुंबईत काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

केंद्र सरकारच्या बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाच्या वतीने जेएन पोर्ट पीएसए मुंबई टर्मिनलच्या दुसऱ्या टप्प्याचे उद्‌घाटन समारंभ ४ सप्टेंबरला दुपारी होणार आहे. हे उद्‌घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग हे उपस्थित असणार आहे. तसेच केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल, राज्याचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री शांतनु ठाकूर, खासदार अप्पा बारणे, उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी उपस्थित असणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नवी मुंबईत येणार असल्याने प्रशासनाने तयारी सुरु केली आहे. नवी मुंबईत पोलिसांकडूनही सर्वत्र तपासणी केली जात आहे. तर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनीही मोदी यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरु केली आहे. मोदी हे या कार्यक्रमात काय वक्तव्य करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# गणपती ही गोंगाटाची नव्हे तर नवनिर्मितीची देवता

जिथे सुरक्षेची खात्री असते तिथे लोक एकत्र येत असतात. या एकत्र आलेल्या लोकांना पूर्वी गण म्हटलं जायचं. सुपीक नदीपात्राच्या परिसरात जिथे उत्तम जमीन, मुबलक पाणी आणि निरव शांतता आणि गणाच्या एकत्रितपणे राहण्याच्या स्वभाव आणि वृत्तीमुळे गनसमाज निर्माण झाला. या गणांचा नायक तो गणनायक . गणांचा अधिपती या अर्थाने गणपती .

गणसमाजाला स्थिरता आणि सुरक्षितता प्राप्त करून देण्याच कार्य गणपती या त्यांच्या अधिपतीमुळे सहज शक्य झाले . गणपती हा अतिशय शांतपणे विचार करणारा बुद्धिमान असा नायक जो कायम नवनिर्माण करण्यात मग्न असल्याने त्याला गणसामाजच्या विकासासाठी शांतता अत्यंत प्रिय होती. त्याला गोंगाट अजिबात पसंद नव्हता. गणसमाजाचा सतत विकास होत राहावा, त्यांच्यात शिस्त यावी यासाठी गणाधिशाने सृजनशीलतेला अधिक महत्व द्यायला सुरुवात केली. शेती, संगीत, शास्त्र, कला, विद्या, स्थापत्य यांच्या विकासाला चालना देण्यासाठी त्याने वर्षाला गणसमाजात प्रतियोगीता सुरू केल्या. दरवर्षी विविध गणसमाजातील गणाधिश एकत्र येऊन आपल्या गणांच्या सहकार्याने या स्पर्धा पार पाडत त्यात - संगीत, नृत्य, शेतीतील विविध शोध, अशाप्रकारे विविध स्पर्धा होत असत. वेगळे आणि नाविन्यपूर्ण स्पर्धात्मक प्राविण्य दाखविणाऱ्या गणास विशेष पुरस्काराने सन्मानित केले जात.

**सुनिल इंगळे,**
**सामाजिक कार्यकर्ते, खडकपाडा, कल्याण**

गणांनी एकत्र येऊन करायचा उत्सव म्हणून त्याला आपण "गणोत्सव" म्हणू शकतो. गणाधिश गणपती हाच संपूर्ण गणसमाजाचा प्रमुख असल्याने गणांचा विकास आणि असे होत असताना गणसमाजामध्ये शांतता कशी नांदेल याला त्याचे प्राधान्य असायचे.

गणसमाजाचा हा गणाधिश गणपती त्या काळातील संस्कृतीशी म्हणजेच शेती संस्कृतीशी संबंधित असल्याने शेतीमातीत राबणाऱ्या लोकांचा विकास आणि त्यात राबणाऱ्या लोकांचा उत्सव तोच गणोत्सव होता.

खरीप हंगामाच्या वेळेस भात लावताना गाणी म्हणत हा शेतकरी गण आपला उत्सव साजरा करायचा तर कापणीच्या वेळेस खळे करत असताना गाणे म्हणत पुन्हा तालासुरात गाणे म्हणत, नृत्य करत निसर्गाच्या कृपेने आणि गणाधिशाच्या आशिर्वादाने आलेली धान्य रास पाहून तृप्त व्हायचा. मग अशा दिवशी सार्वजनिक भोजनावळी व्हायच्या. गणसमाजात आनंदी आनंद असायचा. लोक गाणी म्हणत, नृत्य करत आपला आनंद साजरा करायचे परंतु तो त्यांच्या नवनिर्मिती आणि सृजनशीलतेचा उत्सव होता, गोगाट धांगडधिंगा नव्हता.

मुळात गणसमाजाची मुख्य प्रेरणास्त्रोत आहे. ती सुखाची, आनंदाची, बुद्धीची, नवनिर्मितीची आणि मुख्य म्हणजे शांततेची देवता आहे. समाजात अशांतता पसरविणाऱ्याला गणाचा प्रमुख या भूमिकेतून गणपती अशा उपद्रवीमूल्य पेरणाऱ्या वृत्तीला शिक्षा द्यायचा, शासन करायचा. समाजात शांतता पेरणाऱ्यांना पुरस्काराने सन्मानित करायचा. आणि समाजाच्या विकासासाठी, म्हणजे समाजात शांतता आणि नवनिर्मिती या दोन्हीसाठी कार्य करणाऱ्या समाजसाक्षर गणाला आपल्या गणातील विशेष पदावर नियुक्ती करून समाजविकासासाठी गणसमाजातील प्रत्येक व्यक्तीला प्रेरित करायचा.

पण आज या सर्व गोष्टींची चिकित्सा केली असता आजचा समाज गोंगाट, नैराश्य यात स्वतः बुडालेला आहे. समाजातील उपद्रवीमूल्य व्यवस्था समाजात सतत अशांतता कशी राहील यासाठीच प्रयत्नरत असतात. गणपतीने समाजाला दिलेली शिकवण ते कधीचेच विसरले असून गणपती'च्या नावाखाली गणपतीने दिलेली शिस्त, शांतता, ज्ञान, सृजनशीलता याची शिकवण हळूहळू विसरली जाऊन भडकावूपणा, गोंगाट, अशांतता यांना महत्व आणि प्राधान्य दिले जात आहे. आणि अशा गोष्टीला गणेशोत्सव म्हटले जात आहे. मुळात सृजनशीलता आणि शांततेची देवता असणाऱ्या गणाधीशाचा हा अपमान आणि उपमर्द आहे हे आपला समाज समजून का घेत नाही ? हा खरा प्रश्न आहे.

समाजात बेशिस्त निर्माण करून, समाजात कर्णकर्कश साधनांचा वापर करून गोंगाट आणि अशांतता पसरवून ही बुद्धीची, शांततेची देवता असणारा गणपती कधीही प्रसन्न होणार नाही तर समाजात राहणाऱ्या कोणालाही त्रास होणार नाही, सगळयांचे जीवन आनंदाचे, शांततेचे आणि उत्साहाचे कसे होईल यासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी गणाधिश गणपती सदैव असतो आणि त्याचा विकास करतो हे खऱ्या गणेशभक्ताने समजून घेणे आवश्यक आहे. गणपती ही अज्ञानाची नव्हे तर ज्ञानाची देवता आहे. गणपती ही गोंगाटाची नव्हे तर शांततेची देवता आहे. गणपती हा भडकावूपणाचा नायक नसून नवनिर्मिती आणि प्रगतीचा गणनायक आहे हे आपल्यातील प्रत्येकाने समजून घेण्याची हिच खरी वेळ आहे.

गणाधिश, गणाधिनायक गणपतीचा जयजयकार असो....

# पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळीसाठी ठाण्यात कार्यशाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळ उभी करण्यासाठी जिल्हा स्तरावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ३ सप्टेंबर, २०२५ रोजी ठाणे येथील बी. जे. हायस्कूल सभागृह, टेंभी नाका येथे "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" या शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हास्तर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत जिल्हा परिषदेबरोबरच जिल्ह्यातील सर्व विभागांचे प्रतिनिधी, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहून अभियानाची उद्दिष्टे, भूमिका व जबाबदाऱ्या यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामविकासाला गती देऊन प्रत्येक गावात शाश्वत विकास साधण्यावर भर देण्यात आला.




ग्रामपंचायतींनी पीएम आवास, जलसंधारण व महसुलाशी संबंधित काम वेळेत करावे. समन्वय ठेवावा तसेच ग्रामपंचायतीना अभियानात पात्र होण्यासाठी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांना योजनांची अचूक माहिती द्यावी. या कार्यशाळेत मनरेगा अंतर्गत घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने व सार्वजनिक मत्ता यांचे नोंदी व सुस्थितीत असल्याची दक्षता घेण्याबाबत सुचना दिल्या. महिला बचतगट, बांबू लागवड उपक्रम तसेच त्यासाठी बाजारपेठ उभारणी, आरोग्य व पायाभूत सुविधांसाठी मिशन कायाकल्पांतर्गत योजना प्रभावीपणे राबवावे. सौरदिवे, ई-लायब्ररी सारखे जिल्ह्यात नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घ्यावा. तसेच सर्व गांमपंचायतींना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांत सहभागी होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. कृष्णा पांचाळ यांनी दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामविकासाची खरी ताकद लोकसहभागात असल्याचे सांगून प्रत्येक ग्रामपंचायतीने स्वनिधी, जलसमृद्धी, घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने, सार्वजनिक मत्ता व उपजीविका योजनेसारख्या उपक्रमांवर ठोस कामकाज करावे, असे आवाहन केले. त्यांनी स्वामित्व योजना, मिशन कायाकल्प, आरोग्य सुधारणा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करून ग्रामपंचायतींनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जल्लोषाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यशाळेत सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण, संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभागातून लोकचळवळ, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच विविध मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्वनिधी निर्मिती व लोकवर्गणीद्वारे ग्रामपंचायतींचे आर्थिक सक्षमीकरण, पाणीपुरवठा, जलसंधारण व पर्यावरण संवर्धन, शेततळे व घरकुल बांधकाम योजनेशी अभिसरण, ग्रामपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण आणि महिला बचतगट, शेतकरी व दुर्बल घटकांसाठी ठोस उपाययोजना यावर विशेष भर देण्यात आला.

सरपंच (काल्हेर) आश्लेषा पंकज तरे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत अधिकाधिक ग्रामपंचायती पात्र व्हाव्यात आणि स्पर्धेत जिंकावे यासाठी प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगितले.

कार्यशाळेला प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता (बांधकाम) पद्माकर लहाने, समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे, कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर तसेच मोठ्या संख्येने ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यशाळेत विस्तार अधिकारी (सेवानिवृत्त) विक्रम चव्हाण व विस्तार अधिकारी (पंचायत समिती, भिवंडी) इंद्रजीत काळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहाय्यक गट विकास अधिकारी पंडित राठोड यांनी केले.

# केडीएमसीच्या प्रभाग रचनेवर आरपीआयची हरकत

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या माजी नगरसेविका मनिषा रणदिवे व राजू रणदिवे यांनी नोंदवली हरकत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रभाग रचना पॅनल प्रणालीतील अशोक नगर व शिवाजी नगर प्रभागाच्या चुकीच्या विभागणीबाबत आरपीआयने हरकत घेतली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे माजी नगरसेविका मनिषा रणदिवे आणि कल्याण शहर माजी अध्यक्ष राजू रणदिवे, मंगल पाठारे, जितू अहिरे, सचिन चंदने, अमोल पंडित यांनी केडीएमसी आयुक्तांकडे तथा महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाच्या अध्यक्षांकडे हरकत नोंदवली आहे. अशोक नगर व शिवाजी नगर हे प्रभाग कल्याण पूर्व पॅनलमध्येच समाविष्ट करण्यात यावेत. रामबाग, कर्णिक रोड रोड, जोशीबाग व पश्चिमेकडील प्रभागाशी जोडण्यांचा निर्णय तातडीने मागे घेण्यात यावा. याबाबत स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था व संघटनांचा थेट सहभाग व सल्लामसलत घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रभाग रचनेत प्रभागाची नैसर्गिक व भौगोलिक विभागणी मोडीत काढली. अशोक नगर व शिवाजी नगर हे ऐतिहासिक दृष्टया कल्याण पूर्व भागाशी जोडलेले आहेत. नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील सर्व सुविधा, बाजारपेठ, शाळा, शासकीय कार्यालये, रेल्वे स्थानक यांचा उपयोग हा पूर्णपणे कल्याण पूर्वकडे केंद्रित आहे. तरीसुध्दा सध्याच्या पॅनल रचनेत या दोन्ही प्रभागांना राजकीय हेतूने कल्याण पश्चिमेकडे जोडण्यात आले आहे. हे पूर्णपणे अव्यवहार्य आणि अन्यायकारक आहे.




लोकसभा व विधानसभा कल्याण पूर्वेची असून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व आमदार सुलभा गायकवाड आहेत. या दोन्ही प्रभागातून दिल्ली कडे जाणाऱ्या रेल्वेलाईन आहेत. रेल्वे लाईन, नदी, मोठे रस्ते असतील तर त्या ओलांडून वॉर्ड करण्यात येऊ नये असे आदेश असतांना, या सर्व बाबी अशोक नगर शिवाजी नगर याठिकाणी येत असून मतदारांना व नागरिकांना पलीकडे जाण्यास कुठलीही सोय नाही. स्थानिक उमेदवारांना नागरीकांचे प्रश्न व समस्या व्यवस्थीत माहिती असतात. परंतु कल्याण पश्चिम भागाशी जोडल्यास या परिसरातील नागरिकांना बाहेरील, अनोळखी उमेदवाराकडे जाण्याशिवाय पर्याय राहणार नाही. यामुळे स्थानिकांचे मताधिकार व प्रतिनिधित्व दिशाभूल होऊन कमकुवत होईल.अशोक नगर, शिवाजी नगर, तसेच लगतची आनंदवाडी व मिलिंद नगर हया वस्त्या मोठया प्रमाणावर मागासवर्गीय, अल्पसंख्याक, मजूर वर्ग व सामाजिक दृष्टया दुर्बल घटकांनी वसलेली आहेत. या भागातील नागरिकांचे प्रश्न वेगळे, ठोस व तातडीचे आहेत. झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन, मुलभूत सुविधा पाणीपुरवठा, रस्ते, गटार, शाळा व आरोग्यसेवा, रोजगार व उदरनिर्वाह या समस्यांची जाण असणारा स्थानिक नगरसेवकच योग्य तो निर्णय घेऊ शकतो. परंतू जर हा प्रभाग कल्याण पश्चिममध्ये जोडला तर येथील समस्यांकडे दुर्लक्ष होण्याची दाट शक्यता आहे.अशोक नगर व शिवाजी नगर येथील नागरिकांची बहुतेक कामे कल्याण पूर्वमधील शासकीय कार्यालयांशी निगडीत आहेत. जर हे प्रभाग पश्चिममध्ये जोडले गेले तर नागरिकांना अनावश्यक अडचणी व त्रास सहन करावा लागेल. त्यामुळे ही विभागणी न्यायालयीन दृष्टीनेही अनुचित व आक्षेपार्ह ठरू शकते असे या हरकतीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

# बाप्पाच्या सजावटीसाठी खेड्यातील घराची आरास

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : कल्याण येथील काग्रेस नेते व वैश्य समाजाचे माजी अध्यक्ष राजाभाऊ पातकर यांच्या घरी विराजमान झालेल्या गणपती बाप्पा साठी बनविलेल्या मखरात ग्रामिण भागातील गाववस्ती साकारल्याने कौतूक होत आहे. ग्रामिण भागातील बांबू - गवतापासून बनवलेली घर सर्वांच्याच परीचीत आहेत. मात्र जसजसा काळ बदलत केला तसतरी गवसापासून बनवलेली घरे, कौलारू घरे लुप्त पावत चालली आहेत. या ग्रामिण भागाची ओळख राहावी म्हणून रीया पातकर ही शहरात असली तरी लहानपणी ग्रामिण भागात खेळल्या बागडल्याने तिने ग्रामिण भागात असलेली घरे पेंडा, बांबूच्या काठ्या, सुंतळ आदी साहित्य वापरून हुभेहूब साकारल्याने गाव खेड्यातील संस्कृती जोपासली आहे. ही कल्पक्ता अधूनिक युगातही जोपासल्याने वैश्य समाजाचे अध्यक्ष निलेश गंध्ये, समन्वय समिती प्रमुख दिलीप भोपतराव, सल्लागार नंदकिशोर मलबारी, सुधीर जगे यांनी भेट देऊन रीया पातकर हिचे कौतूक केले.



जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

## आरोग्य

# व्हिटामीन बी-१२ हवं तर रोज खा 'या' डाळीचं वरण

किचनमध्ये बरेच असे पदार्थ असतात ज्याच्या सेवनानं शरीराला फायदे मिळतात. तुम्ही योग्य पद्धतीनं काही पदार्थांचे सेवन केले तर शरीरात काही घटकांची कमतरता उद्भवण्यापासून वाचवता येईल. मूग डाळ सर्व डाळींमध्ये पचायला हलकी असते. जास्तीत जास्त लोक मूग डाळीचे सेवन करतात. खिचडी, भाज्या, पराठा अशा अनेक पदार्थांमध्ये मूग डाळ असते. मूग डाळ खाल्ल्यानं शरीरात पोषक तत्वांची कमतरता भासत नाही.

क्लाऊडनाईन केअरच्या तज्ज्ञांच्यामते हिरवी मुगाची डाळ अधिक पौष्टीक असते.व्हिटामीन बी-१२ असं तत्व आहे जे शरीरात डिएनए बनवण्यासाठी आणि शरीराच्या पेशींना उर्जा देण्यास मदत करतात. या व्हिटामीन्सच्या कमतरतेनं एनिमीया, थकवा, कमकुवतपणा अशा समस्या उद्भवतात. अशा स्थितीत व्हिटामीन्सची कमतरता पूर्ण करण्यासाठी तुम्ही सप्लिमेंट्सचा आधार घेण्यापेक्षा व्हिटामीन बी-१२ असलेल्या प्राकृतिक पदार्थांचा आहारात समावेश करू शकता. रोजच्या जेवणात काही बदल केल्यास हे शक्य होईल.

व्हिटामीन बी-१२ मिळवण्यासाठी आहार आणि लाईफस्टाईलमध्ये काही बदल करायला हवेत. व्हिटामीन बी-१२ मांसाहारात जास्त असते असा समज आहे पण किचनमध्ये उपलब्ध असलेल्या व्हेज पदार्थांमध्ये बी-१२ भरपूर असते. याव्यतिरिक्त या डाळीत व्हिटामीन बी१, बी६ असते जे शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांसाठी गरजेचे असते. मूग डाळीतील व्हिटामीन ए डोळयांचे आरोग्य सुधारण्यास मदत करते. यामुळे नाईट ब्लाईंडनेससुद्धा कमी होतो. हाडं मजबूत होतात. व्हिटामीन सी सुद्धा यात असते. ज्यामुळे इम्यून सिस्टीम मजबूत होते. संक्रमणापासून लढता येतं आणि जखम लवकर बरी होण्यासही मदत होते.

व्हिटामीन बी-१२ चा स्त्रोत मुगाची डाळ रात्री झोपण्याआधी मूग डाळ व्यवस्थित धुवून साफ करून घ्या. त्यानंतर पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी डाळ व्यवस्थित भिजल्यानंतर या डाळीच्या पाण्याचं सेवन करा. भात किंवा चपातीसोबत तुम्ही या डाळीचं वरण खाऊ शकता. ही डाळ शिजवताना कांदा, लिंबू घालूनही सेवन करू शकता. सकाळच्या नाश्त्याला तुम्ही मूग डाळीचा डोसा खाऊ शकता. सॅलेड, किंवा हलवा, खिचडी, स्प्राऊट्समध्ये घालून खाऊ शकता. यामुळे पोट जड वाटत नाही आणि दीर्घकाळ पोट भरलेलं राहतं.

# पेण तालुक्यात गौरी गणपतींना मनोभावे निरोप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर, गणपती चालले गावाला चैन पडेना आम्हाला या जयघोषात वाजत गाजत गुलाल बुक्का फुले उधळत भजन म्हणत गौराई आणि पाच दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन पेण तालुक्यात मोठ्या आनंदात आणि उत्साहाच्या वातावरणात तसेच परंपरा व संस्कृती राखत डोक्यावर बाप्पाला व गौराई ला घेऊन मनोभावे निरोप दिला.यावेळी कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठिकठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता.

पेण तालुक्यातील बाळगंगा पाताळगंगा भोगावती या नदीच्या पात्रात खाडीकिनारी तलावात तसेच प्रत्येक विसर्जन घाटावर योग्य ती उपाययोजना देखील करण्यात आली होती. बाप्पांना गणेशभक्तांनी भावपूर्ण निरोप दिला. पेण तालुक्यातून ११ सार्वजनिक, ९हजार२५ खाजगी बाप्पांचे आज विसर्जन करण्यात आले तर दोन हजारहून अधिक गौराईंचे देखील आज विसर्जन करण्यात आले. यामध्ये पेण पोलिस ठाणे हद्दीतील २ हजार ९०० खाजगी, ३ सार्वजनिक बाप्पा तर १ हजार ५३५ गौरींचे विसर्जन करण्यात आले. तर दादर सागरी पोलीस ठाण्याचे हद्दीतील ३ हजार ११५ खाजगी आणि ५३५ गौरींचे विसर्जन करण्यात आले. त्याचप्रमाणे वडखळ पोलीस ठाणे हद्दीतील ३ सार्वजनिक आणि ३हजार १० खाजगी बाप्पांचे विसर्जन आज करण्यात आले. यावेळी पेण पोलिस ठाण्याचे ७ अधिकारी, ४३ कर्मचारी आणि १४ होमगार्ड, वडखळ पोलिस ठाण्याचे ५ अधिकारी, १५ कर्मचारी आणि १५ होमगार्ड, तर दादर सागरी पोलिस ठाण्याचे ३ अधिकारी, १७ कर्मचारी आणि ८ होमगार्ड असे एकूण १५ अधिकारी, ७५ कर्मचारी आणि ३७ होमगार्ड असा चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

## आजचे राशि भविष्य

**मेष**
नातेवाईकांच्या आगमनामुळे घरात उत्सवाचे वातावरण असेल आणि सकारात्मक संवादही होतील. प्रत्येक काम एकाग्रतेने केल्यास यश मिळेल.

**वृषभ**
कोणाशीही वादात पडू नका आणि अहंकारावर नियंत्रण ठेवा. तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल जेणेकरुन तुम्हाला हवे ते सर्व साध्य करता येईल.

**मिथुन**
कोणत्याही परिस्थितीत घरातील मोठ्यांचा सल्ला जरूर घ्या, तुम्हाला चांगला सल्ला मिळेल. भावनेच्या भरात आज कोणालाही वचन देऊ नका.

**कर्क**
बहुतेक बाबतीत भाग्यवान समजाल. कुटुंबीयांसह खरेदी इत्यादीमध्ये व्यस्त असाल. भावांसोबत सुरू असलेले मतभेद मिटून नात्यात पुन्हा गोडवा येईल.

**सिंह**
काम तुमच्या इच्छेनुसार होणार आहे, त्यामुळे कोणतीही मेहनत कमी करू नका.माहितीपूर्ण साहित्य वाचण्यासाठी थोडा वेळ घालवाल.

**कन्या**
संवादाशी संबंधित काही नवीन तंत्रज्ञानाचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. आजूबाजूच्या लोकांमध्ये चांगली प्रतिमा तयार होईल. तब्येत ठीक राहील.

**तूळ**
तुमच्या स्वभावात लवचिकता आणा. तुम्ही तुमच्या मनात काहीतरी विचार कराल. आज आर्थिक बाबतीतही पूर्णपणे सावध राहण्याची गरज आहे.

**वृश्चिक**
रागावर नियंत्रण ठेवा.मित्राकडून आर्थिक मदत मिळेल. घरातील वातावरण अनुकूल राहील, सामाजिक कार्यात कार्यक्षमतेचे कौतुक होईल.

**धनु**
कोणतेही महत्त्वाचे काम वेळेवर पूर्ण होईल. तुमच्या मनात अनेक सकारात्मक भावना येतील. प्रियकरासाठी आजचा दिवस अनुकूल आहे.

**मकर**
आई-वडिलांच्या आरोग्याबाबत चिंतेत असाल. खर्चात उदार होऊ नका आणि इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका, यामुळे जीवनात शांतता येईल.

**कुंभ**
तुमच्या योजना कोणाला सांगू नका. जास्त विचार करून वेळ वाया जाऊ शकतो, त्यामुळे उपलब्धी हातात आली की लगेच कामाला लागा.

**मीन**
कामाचा ताण कमी राहील. कोणतेही महत्त्वाचे कार्यालयीन काम करण्यासाठी वरिष्ठ तुमची मदत करतील, त्यामुळे कामे सहज पूर्ण होतील.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# मिरा-भाईंदर शहरात डेंग्यूची साथ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर, ता. २ (बातमीदार): मिरा-भाईंदर शहरात सध्या डेंगीची लागण झाल्याचे रुग्ण मोठ्या संख्येने आढळत आहेत. गेल्या काही दिवसांत सुमारे १० जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मुसळधार पावसाने शहरात ठिकठिकाणी पाणी साचण्याचे प्रकार वाढत असून, त्यातून डासांची मोठ्या प्रमाणावर पैदास होत आहे. त्यातच डेंगीला कारणीभूत ठरणाऱ्या डासांची संख्यादेखील वाढत असल्याचा संशय आहे.**

मिरा-भाईंदर शहरात सध्या मोठ्या प्रमाणात ताप, सर्दीचे रुग्ण आढळून येत असून, खासगी दवाखाने रुग्णांनी भरलेले दिसून येत आहेत. या रुग्णांमध्ये डेंगीची लक्षणे असलेले रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. भाईंदर पश्चिम भागात राम मंदिर परिसरात एका ५५ वर्षीय व्यक्तीचा, तसेच पेणकर पाडा भागात एका १३ वर्षीय मुलाचा नुकताच मृत्यू झाला आहे, तर उत्तन व चौक परिसरात गेल्या काही दिवसांत किमान आठ जणांचा मृत्यू झाला आहे. खासगी डॉक्टरांनी हे मृत्यू डेंगीमुळे झाल्याचे सांगितले आहे, मात्र महापालिकेच्या आरोग्य विभागात अद्याप तशी अधिकृत नोंद नाही. असे असले तरी शहरात डेंगीची लागण झालेले रुग्ण असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या पावसाने उत्तन भागातील गल्ली-बोळात पाणी साचले आहे. त्यामुळे डेंगीची लागण होण्याचे प्रमाण वाढले आहे. खासगी डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तन भागात डेंगीची लागण झालेले रुग्ण मोठ्या प्रमाणात असून, उत्तन व चौक भागात किमान आठ जणांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती खासगी डॉक्टरांनी दिल्याचे मच्छीमारांचे नेते बर्नड डिमेलो यांनी दिली. महापालिकेने विशेष डॉक्टरांचे एक पथक पाठवून उत्तन परिसराची तत्काळ पहाणी करावी, तसेच या भागात धूर फवारणी व साफसफाईची मोहीम राबविण्यात यावी, अशी मागणी डिमेलो यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

## वसई विरार पालिकेच्या स्मशानभूमीत लाकडांचा तुटवडा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** विरार पूर्वेच्या फुलपाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यासाठी लागणाऱ्या लाकडांचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे या स्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ लागली आहे. विरार पूर्वेच्या फुलपाडा परिसरात पालिकेने अंत्यसंस्कार करण्यासाठी स्मशानभूमीत तयार केली आहे. या स्मशानभूमीत नागरिक मृतदेह घेऊन येत असतात. मात्र मागील महिनाभरापासून मृतदेह जाळण्यासाठी लागणारी लाकडेच यात पुरेशा प्रमाणात नसल्याने अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत.



## ठाण्यात मेट्रोच्या माध्यमातून महायुतीची मतपेरणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** वाहतूक कोंडीचे अडथळे पार करत घोडबंदर रोडवरुन प्रवास करणाऱ्या सर्वसामान्यांना 'मेट्रो'च्या माध्यमातून गेल्या १५ वर्षांपासून कोंडीमुक्त प्रवासाचे स्वप्न दाखवले जात आहे. सोमवारी 'वडाळा - घाटकोपर - कासारवडवली' या मेट्रो चार प्रकल्पाचे सहा कोच ठाण्यात दाखल झाल्याने या प्रकल्पाला काही प्रमाणात मूर्त स्वरुप आले आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या तोंडावर ठाणेकरांसह प्रामुख्याने घोडबंदर रोडवासियांचे कोंडीमुक्त प्रवासाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याच्या हालचालींना वेग आला आहे. त्यामुळे सत्ताधारी शिवसेना व भाजप 'मेट्रो'च्या माध्यमातून 'मतपेरणी' करणार असून सत्ताधाऱ्यांकडून विकासाचे कार्ड दाखवत येथील मतदाराला भावनिक साद घातली जाण्याची शक्यता आहे.

दहा ते १५ मिनिटांच्या अंतरासाठी एक ते दीड तासांचा खोळंबा, खड्डेमय प्रवासाने वाहनचालक बेजार, अवजड वाहनांच्या कोंडीत सर्वसामान्य हैराण अशा विशेषणांनी वाहतूक कोंडीच्या गर्तेत अडकलेल्या घोडबंदरवासियांचे मेट्रो मार्गिकेकडे डोळे लागले होते. मुंबईहून विनाअडथळा घोडबंदरच्या दिशेने येणारी वाहने कापूरबावडी जंक्शनपासूनच कासवगतीने पुढे सरकतात. अवजड वाहनाच्या अपघातानंतर होणारी कोंडी व पावसाळयात या मार्गावरील वाहनचालकांच्या सहनशीलतेची कसोटी लागते.

अशा परिस्थितीत मेट्रोचे ट्रायल रन सुरु असून ही मेट्रो या वर्षाअखेरीस सुरु होईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अध्यक्ष एकनाथ शिंदे यांनी केले. त्यामुळे ठाणेकरांना मेट्रो मार्गिका आणि स्थानकांच्या पलीकडे आता मूर्त स्वरूपात या मार्गावर मेट्रो कोच दिसत आहेत. शिंदे यांनी केलेल्या घोषणेनुसार येत्या सप्टेंबर महिन्यात या मार्गिकेवर गाडीची चाचणी झाल्यास सत्ताधारी शिवसेनेसह भाजपला आगामी पालिका निवडणुकीत प्रचारात मेट्रोच्या स्वप्नपूर्तीचा हक्काचा मुद्दा मिळणार आहे.

## कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रात गौरी - गणपतींचे भक्तिभावाने विसर्जन!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण डोंबिवली परिक्षेत्रातील गौरी- गणपतींचे काल (दि. 02) मोठ्या उत्साहात व मंगलमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. काल पीओपीच्या १६०६९ आणि शाडूच्या ८५०३अशा २४५७२ गौरी गणपतींचे विसर्जन झाले.

पर्यावरणाच्या रक्षणासाठी शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार ६ फुटापेक्षा कमी उंचीच्या श्री गणेश मूर्तीचे विसर्जन, कृत्रिम विसर्जन स्थळी करणेबाबत महापालिकेने केलेल्या-सततच्या आवाहनानुसार, जनजागृतीनुसार बहुसंख्य श्री गणेश भक्तांनी / नागरिकांनी महानगरपालिकेने उभारलेल्या कृत्रिम तलावांत/ कृत्रिम विसर्जन स्थळांवर आपापल्या मूर्तींचे विसर्जन केले. महापालिकेने सर्व विसर्जन स्थळांवर ठेवलेल्या चोख व्यवस्थेबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले.काल सर्व विसर्जन स्थळी सुमारे ६८ टन निर्माल्य संकलित झाले.

हे निर्माल्य मा.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांचा खत प्रकल्प, गणेश मंदिर डोंबिवली येथील खत प्रकल्प तसेच महापालिकेचे बायोगॅस प्रकल्प व खत प्रकल्प येथे पाठविण्यात आले.



## मंत्रालयातून मोर्चेबांधणी ? नवी मुंबईत 'नगररचना' विभागासाठी वशिल्याचे दबावतंत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** नवी मुंबई: नवी मुंबई शहराच्या विकास आराखड्यास राज्य सरकारची मंजुरी मिळताच महापालिकेतील बहुचर्चित नगररचना विभागात मोक्याचे पद मिळावे यासाठी राज्यातील काही प्रभावी मंत्री, त्यांचे स्वीय साहाय्यक, मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच सत्ता वर्तुळात प्रभाव राखून असणाऱ्या बड्या नेत्यांकडून थेट महापालिका आयुक्तांवरच दबावतंत्राचा अवलंब सुरू असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

नगररचना विभागात वर्षानुवर्षे ठाण मांडून असलेले काही अभियंते अधिकचे अधिकार तसेच मोठ्या विकास प्रकल्पांच्या फायलीवर काम करण्याची संधी मिळावी यासाठी काही बड्या मंत्र्यांकडे जोडे झिजवू लागल्याची चर्चा आहे. शहर नियोजनाचे महत्त्वाचे काम असणाऱ्या या विभागात सुरू झालेले हे वशिल्याचे दबावतंत्र सध्या चर्चेत असून प्रशासकीय राजवटीत घडणाऱ्या या प्रकारांमुळे महापालिका वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचवल्या आहेत.

नवी मुंबई महापालिकेत अभियांत्रिकी आणि नगररचना हे दोन अतिशय प्रभावी विभाग मानले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत असलेल्या शहराच्या विकास आराखड्याला राज्य सरकारने नुकतीच मंजुरी दिली.

त्यामुळे शहर विकासाचा नेमका मार्ग यापुढे काय असेल याविषयी स्पष्टता आली. गेल्या काही वर्षांपासून शहरातील काही ठरावीक उपनगरांमध्ये पुनर्विकास प्रकल्पांचे वारे वेगाने वाहू लागले आहेत. नवी मुंबई महापालिका हद्दीत मोकळ्या भूखंडांची संख्या तशी कमी आहे. त्यामुळे सिडकोच्या जुन्या इमारतींच्या जागी आखल्या जाणाऱ्या पुनर्विकास प्रकल्पांमुळे शहरातील बांधकाम व्यवसायाला पुन्हा एकदा ऊर्जितावस्था मिळू लागली आहे.

## जिल्हा प्रशासनाकडून उत्कृष्ट छायाचित्रांचा गौरव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** दि.३ - ठाणे जिल्ह्याचे सौंदर्य आणि समृद्ध संस्कृती जगासमोर आणण्याच्या उद्देशाने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने एक अनोखी 'छायाचित्रण स्पर्धा २०२५' आयोजित केली आहे. जिल्ह्यातील निसर्गाची भव्यता, वन्यजीव, लोकजीवन आणि बदलत्या ठाण्याचे विविध पैलू टिपण्यासाठी या स्पर्धेच्या माध्यमातून सर्व हौशी,नवोदित, व्यावसायिक छायाचित्रकारांसह नागरिक, विद्यार्थी आणि शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनाही एक उत्तम संधी मिळणार आहे. या स्पर्धेमध्ये १) 'वन्यजीव', २) 'निसर्ग', ३) 'संस्कृती आणि परंपरा' तसेच ४) 'बदलते ठाणे आणि विकास प्रकल्प' या चार विषयांवर आधारित छायाचित्रे स्वीकारली जातील. प्रत्येक छायाचित्रकाराला प्रत्येक विषयासाठी जास्तीत जास्त ४ छायाचित्रे पाठवता येतील. ही छायाचित्रे उच्च दर्जाची (High-Resolution HD 10MB) असणे आवश्यक आहे. ही छायाचित्रे thanedio2025@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवायची आहेत. छायाचित्रे सादर करण्याची अंतिम तारीख १७ सप्टेंबर २०२५, सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. स्पर्धेतील उत्कृष्ट छायाचित्रांची निवड तज्ज्ञ समितीद्वारे केली जाईल.

# कल्याण : पत्रकाराच्या दुचाकीला धडक देत तरूणाची धमकी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील शिवाजी चौकात मंगळवारी रात्री अकरा वाजण्याच्या दरम्यान दुचाकीवरून चाललेल्या एका तरूणाने पत्रकार सुरेश काटे यांच्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या धडकेत काटे यांच्या हाताला दुखापत झाली. आपण दुचाकी शांतपणे चालवा, असा सल्ला काटे यांनी त्या तरूणाला देताच, तरूणाने दादागिरीची भाषा करत शिंदे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष गोपाळ लांडगे, ज्येष्ठ शिवसैनिक नितीन माने यांच्या प्रतिमा पत्रकार काटे यांना दाखवत शिवीगाळ करत मारण्याची धमकी दिली.

तु माझ्या दुचाकीला पाठीमागून धडक दिली आहे. यात मला दुखापत झाली आहे आणि तुच मला पुन्हा शिवागाळ मारण्याची धमकी देत आहेस, असे पत्रकार काटे यांनी दुचाकीवरील त्या तरूणाला सांगितले. पण, तरूण काही ऐकण्यास तयार नव्हता. तो दादागिरीची भाषा करत होता. जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे आणि कल्याण मधील ज्येष्ठ शिवसैनिक नितीन माने यांच्या प्रतिमा पाहताच, पत्रकार सुरेश काटे यांनी त्या तरूणाला तु आत्ताच जिल्हाप्रमुख लांडगे आणि माने यांना संपर्क कर आणि आपण पत्रकार काटे यांच्याशी वाद घालत आहोत असे सांग, असे सुचविले. पण तरूण तेही ऐकण्यास तयार नव्हता.


अखेर पत्रकार काटे यांनी तात्काळ पोलीस आणि वाहतूक पोलिसांना या तरूणाने रस्त्यावर चालविलेल्या धिंगाण्या विषयी कळविले. तात्काळ पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी या घटनेची दखल घेतली. महात्मा फुले पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी त्यांनी घटनास्थळी पाठविले. याशिवाय वाहतूक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी आहे. हे प्रकरण शांत करण्यासाठी एक शिवसैनिक घटनास्थळी दाखल झाला. पण तरूण काहीही ऐकण्यास तयार नव्हता.

पोलीस घटनास्थळी येईपर्यंत तरूण दुचाकीवर दोन तरूणींना बसवून निघून गेला. काटे त्याला घटनास्थळी थांबून राहण्याची सूचना करत होते. पण तो नंतर बिथरला आणि निघून गेला. घडल्या घटनेची पत्रकार काटे यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तरूणाच्या दुचाकीच्या वाहन क्रमांकावरून पोलिसांनी त्याची माहिती काढली आहे. आणि त्याचा तपास सुरू केला आहे. या तरूणाला ताब्यात घेण्यासाठी पोलीस पथके सक्रिय झाली आहेत.

गेल्या वर्षी डोंबिवलीत महात्मा फुले रस्त्यावर चार पत्रकारांना शिवीगाळ आणि मारहाण करणाऱ्या प्रकरणाची उपायुक्त अतुल झेंडे यांनी स्वता दखल घेऊन मारहाण करणाऱ्या दादाभाईला लाठीचा प्रसाद देऊन त्याचा लोकांसमोर जाहीर कार्यक्रम केला होता. आणि त्याला भर रस्त्यात उठाबशा काढण्यास भाग पाडले होते. कल्याण, डोंबिवलीत गल्लीबोळात अनेक दादाभाई तयार झाले आहेत. त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

जिल्हाध्यक्ष गोपाळ लांडगे आणि ज्येष्ठ शिवसैनिक नितीन माने यांनी त्या तरूणाशी आमचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. हल्ली कोणीही कोणत्याही नेते, मंत्री यांची प्रतिमा खिशात ठेवतो आणि वावरतो, त्यातला हा प्रकार आहे.

# ठाणे महापालिका क्षेत्रात कृत्रिम तलावातील मूर्ती विर्सजनाचे प्रमाण ७० टक्क्यांवर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (०३) :** गौरी आणि गणपती विसर्जनाच्या सातव्या दिवशी ठाणे महापालिका क्षेत्रातील विसर्जनस्थळांवर एकूण १७९३९ मूर्तींचे विसर्जन झाले. त्यात, १६९४४ गणेश मूर्ती तर, ९९५ गौरी मूर्ती होत्या. त्यात, १२७ सार्वजनिक मंडळाच्या गणेश मूर्तींचाही समावेश आहे. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची परंपरा यशस्वीपणे राबविणाऱ्या ठाणे महापालिकेच्यावतीने निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांनी सात दिवसांच्या गणेश मूर्तींचे व गौरी मूर्तींचे विसर्जन केले. एकूण मूर्तींपैकी १०५१० मूर्ती पीओपीच्या तर, ७३९२ मूर्ती शाडू मातीच्या होत्या.

**७० टक्के मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात**

सातव्या दिवसापर्यंत झालेल्या एकूण विसर्जनात कृत्रिम तलावातील मूर्ती विसर्जनाचे प्रमाण ७० टक्के असून गतवर्षी ते ५१ टक्के होते. तर, खाडीत थेट विसर्जन होणाऱ्या मूर्तीचे प्रमाण यंदा ०६ टक्के असून गतवर्षी ते ३८ टक्के होते. त्याचबरोबर, विशेष टाकी व्यवस्था (हौद) यातील विसर्जनाचे प्रमाण यंदा २० टक्के असून ते गतवर्षी ८ टक्के होते. तसेच, फिरत्या विसर्जन व्यवस्थेतील प्रमाण यंदा चार टक्के आहे असल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात आणि त्यापेक्षा मोठ्या मूर्तीचे विसर्जन खाडी घाटांवर करण्यात येत आहे. काही भाविकांनी छोट्या मूर्तीही खाडीत विसर्जन करण्याचा आग्रह धरला. त्यांना कृत्रिम तलावात विसर्जन करण्यासाठी महापालिका तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने वारंवार विनंती करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर, अनंत चतुर्दशीलाही नागरिकांनी सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले

**गौराईसह सात दिवसांच्या गणपतींचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन**

**१६९४४ गणेश मूर्तींचे तसेच ९९५ गौरी मूर्तींचे विसर्जन**

**१६ टन निर्माल्य भाविकांनी केले दान**

कळवा प्रभाग समिती क्षेत्रात नागरिकांनी सुरूवातीला खाडीत विसर्जनाचा आग्रह धरला होता. मात्र, महापालिका आणि पोलीस प्रशासनाने त्यांना विनंती केल्यावर येथील नागरिकांनी कृत्रिम तलावात मूर्ती विसर्जन करून सहकार्य केले. गजानन नगर, बंदरपाडा येथे सहाय्यक आयुक्त ललिता जाधव, कार्यकारी अभियंता मोहन कलाल आणि प्रशांत फिरके, महापालिका कर्मचारी अशोक माधवी, नरेंद्र गवाते, भगवान पाटील यांच्यासह वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक उतेकर आणि पोलीस निरीक्षक पिंगुळे यांनी त्यासाठी विशेष मेहनत घेतली. त्यामुळे पारसिक घाटावर कोणीही मूर्ती नेली नाही, असेही मनीषा प्रधान यांनी सांगितले.

कृत्रिम तलाव, फिरते विसर्जन पथक, हौद, स्वीकृती केंद्र येथील सर्व मूर्तींचे विधिवत विसर्जन झाल्यावर पाण्याच्या तळाशी जमणाऱ्या मातीच्या गाळावर प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या कृती आराखड्यानुसार प्रक्रिया केली जाणार असल्याची माहितीही प्रधान यांनी दिली.

**भाविकांनी २६२ मूर्ती स्वीकार केंद्रात दिल्या**

महापालिकेच्या एकूण १० ठिकाणी असलेल्या गणेश मूर्ती स्वीकार केंद्रामध्ये प्राप्त झालेल्या एकूण २६२ गणेश मूर्तींचे महापालिकेच्यावतीने स्वीकृती केंद्राच्या जवळच्या कृत्रिम तलावांमध्ये विधिवत विसर्जन करण्यात आले.

**१६ टन निर्माल्यव भक्तां नी केले दान**

यावर्षी निर्माल्यापासून बायो कंपोस्टिंग पद्धतीने खत करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या खत प्रकल्पात निर्माल्य जमा करण्यात आले. कोलशेत, कौसा, ऋतू पार्क येथे हे बायोकंपोस्टिंग प्रकल्प कार्यान्वित आहेत. सातव्या दिवसाच्या गणेश मूर्ती विसर्जनादरम्यान सुमारे १६ टनाहून अधिक निर्माल्य संकलित झाले आहे. या निर्माल्यावर प्रक्रिया करून सेंद्रीय खत तयार केले जाणार आहे.

# अंबरनाथ येथे मानसिक आरोग्यावर मार्गदर्शन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे / दि. ०३ :** अंबरनाथ नगर परिषद दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरी बेघर निवारा केंद्र उलनचाळ अंबरनाथ पश्चिम या ठिकाणी शहरी बेघर निवार्यातील लाभार्थ्यांकरिता दिनांक 2 सप्टेंबर 2025 रोजी शहरी बेघर निवारा केंद्र या ठिकाणी मेंटल हॉस्पिटल ठाणे व हेल्प एज संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्य या विषयावर मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये मार्गदर्शनासाठी सिव्हिल हॉस्पिटल ठाणे येथील डॉक्टर श्री यशवंत सोळंकी मानसोपचार तज्ञ तसेच श्री मीरांडा सर व कल्पेश वाकडे सर हेल्प एज महाराष्ट्र संस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

निवाऱ्यात लाभार्थ्यांमध्ये मानसिक आजारपण काय असते तसेच मानसिक आरोग्य विषयक माहिती देऊन, त्याच्या मधून नैराश्य, चिंता, विसरण्याचे आजार, (depression, anxiety, dimensio कोणत्या गोष्टी महत्वाच्या आहेत. त्या आपल्या आयुष्यात कसा राबवता येतील. तसेच त्या गोष्टीचा अवलंब करून आपण स्वतःसाठी काय करू शकतो या बाबत माहिती देण्यात आली. तसेच शारिरिक आयुष्य सोबत मानसिक आरोग्य का महत्वाचे आहे याविषयी माहिती दिली. यावेळी बेघर निवाऱ्याचे काळजीवाहक, व्यवस्थापक व उपस्थित होते.

## 'अनंत चतुर्थी' निमित्त महाविद्यालयांना सुट्टी द्यावी - आ. निरंजन डावखरे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

"अनंत चतुर्थी" निमित्त कोकण विभागातील सर्व महाविद्यालयांना एकदिवसीय सुट्टी जाहीर करण्यात यावी अशी विनंती आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील यांना केली आहे. आपल्या पत्रात डावखरे यांनी नमूद केले आहे की, कोकणात "अनंत चतुर्थी" हा सण अत्यंत श्रद्धा व उत्साहाने साजरा केला जातो. गणेशोत्सव काळात विसर्जनाच्या दिवशी संपूर्ण कोकणात सार्वजनिक वाहतूक, गर्दी आणि स्थानिक पोलीस यंत्रणेवर मोठा ताण निर्माण होतो. तसेच, अनेक विद्यार्थी व प्राध्यापक हे आपल्या गावी गेलेले असल्याने या दिवशी महाविद्यालयांमध्ये उपस्थिती ठेवणे शक्य होत नाही.त्या अनुषंगाने, कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग इत्यादी जिल्ह्यांतील सर्व महाविद्यालयांना "अनंत चतुर्थी" निमित्त एकदिवसीय सुट्टी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी आमदार डावखरे यांनी केली आहे. "माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव'चा दर्जा दिला. त्या पार्श्वभूमीवर, जर ही सुट्टी जाहीर करण्यात आली तर विद्यार्थ्यांना लाडक्या बाप्पाच्या विसर्जन सोहळयात उत्साहाने सहभागी होण्याची संधी मिळेल आणि बाप्पाला मनोभावे निरोप देता येईल," असे डावखरे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले.




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# महाराष्ट्र राज्य (TAIT) परीक्षेचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक संकीर्ण 2025/प्र.क्र.92/टिएनटी-1, दि. 28 फेब्रुवारी 2025 व मा. आयुक्त (शिक्षण), यांचे जा.क्र. आस्था-क/पाथ 106/टेट-3/वेप/2025/1191, दि.19 मार्च 2025 रोजीच्या पत्रान्वये तसेच सदर परीक्षा शासन निर्णय सामान्य प्रशासन प्रानिमं 1222/प्र.क्र.54/का.13-अ. दि.21 नोव्हेंबर 2022 नुसार शासनाने नेमलेल्या IBPS या संस्थेमार्फत "शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा 2025" चे आयोजन ऑनलाईन पध्दतीने दि.27 मे2025 ते30 मे 2025 व दि.02 जून 2025 ते 05 जून 2025 या कालावधीत राज्यातील 26 जिल्ह्यांमध्ये एकूण 60 परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने 8 दिवसामध्ये प्रतिदिन तीन सत्रात करण्यात आले होते. सदर परीक्षेस एकूण 2 लाख 28 हजार 808 परीक्षार्थी / उमेदवारांनी नोंदणी केली होती त्यापैकी परीक्षेस एकूण 2 लाख 11 हजरी 308 प्रविष्ठ झाले होते.

या परीक्षेचा निकाल दि.18 ऑगस्ट 2025 रोजी गुणयादी व गुणपत्रक (SCORE LIST & SCORE CARD) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच राखीव ठेवण्यात आलेल्या बी.एड. व डी.एल.एड. परीक्षेचे एकूण 6 हजार 320 प्रविष्ठ (Appear) विद्यार्थी/उमेद्वारांपैकी 2 हजार 789 विद्यार्थी/उमेद्वारांचा निकाल दि.25 ऑगस्ट 2025 रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. तथापि विद्यार्थी उमेद्वारांच्या मागणीनुसार पुनःश्च विहित नमुन्यातील गुणयादी (SCORE LIST) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www. mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे- 04 आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे.

## रविवारचे चंद्रग्रहण भारतातून दिसणार

येत्या रविवारी ७ सप्टेंबर रोजी भाद्रपद पौर्णिमेच्या रात्री होणारे खग्रास चंद्रग्रहण संपूर्ण भारतातून दिसणार असल्याचे पंचांगकर्ते, खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी सांगितले.

रविवार ७ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजून ५७ मिनिटांनी चंद्रग्रहणास प्रारंभ होईल. रात्री ११-०० ते १२-२३ संपूर्ण चंद्रबिंब पृथ्वीच्या छायेत आल्याने खग्रास स्थितीचे दर्शन होईल. खग्रास स्थितीमध्ये पौर्णिमेचे संपूर्ण चंद्रबिंब लालसर, तपकिरी रंगाचे दिसेल. रात्री १२-२३ वाजता चंद्रग्रहण सुटण्यास प्रारंभ होईल. उत्तररात्री १ वाजून २७ मिनिटांनी चंद्रग्रहण पूर्णपणे सुटेल. हे खग्रास चंद्रग्रहण सर्वांना साध्या डोळ्यांनी पाहता येईल. यापुढील चंद्रग्रहण मंगळवार ३ मार्च, २०२६ रोजी होईल असेही सोमण यांनी सांगितले.

# कल्याणमध्ये गणेशोत्सवानिमित्त मोदकोत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पारंपरिक उकडीच्या मोदकात अननस, सीताफळचे स्टफिंग, केळे व खोबरे गुळाचे मिश्रण बनवून बनवलेले मोदक, विड्याचे पान व गुलकुंदाच्या फ्लेवरचा पान मसाला मोदक, मुखवास मोदक, आवळ्याचा वापर करून बनवलेले मोदक, तंदुरी मिसळ मोदक, नाचणी व सुकामेव्याचा मोदक यासह तळणीचे मोदक, विविध चॉकलेट, सुकामेव्याचे मोदक अशा विविध प्रकारच्या ३० हून अधिक प्रकारच्या मोदकांनी मोदकोत्सवाची रंगत वाढवली. निमित्त होते ते सुभेदारवाडा कट्टा, कल्याण विकास फाउंडेशन, दी महिला सहकारी उद्योग मंदिर यांच्या वतीने आयोजित मोदकोत्सव स्पर्धेचे. कल्याण पश्चिमेतील पारानाका येथील अभिनव विद्यामंदिरात शनिवारी हा महोत्सव पार पडला. या स्पर्धेसाठी ७८ स्पर्धकांनी सहभाग घेतला असून, त्यांनी विविध प्रकारचे





मोदक सादर केले. उकडीचे मोदक आणि इतर मोदक या दोन गटांमध्ये ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेसाठी ठाणे जिल्ह्यातील व मुंबई परिसरातील स्पर्धक आलेले होते. तसेच या स्पर्धेसाठी २० वर्षे ते ७५ वर्षे पर्यंतच्या महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

इतर प्रकारच्या मोदक प्रकारात महेश गोंधळी (प्रथम), रिद्धी धुमाळ ( द्वितीय), निरजा राव (तृतीय) विजेते ठरले. तर वृंदा राऊत आणि शैला महाजन यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. उकडीच्या मोदक प्रकारांमध्ये भाविका गोंधळी (प्रथम), छाया रासने (द्वितीय), अनुराधा राऊत (तृतीय) विजेते ठरले. त्याचबरोबर मधुरा सावंत आणि दीपाली दळवी यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. सेलिब्रिटी शेफ तुषार देशमुख, शेफ ओंकार पोतदार आणि आहार तज्ज्ञ स्नेहा गीते यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

त्याचबरोबर यंदा घेण्यात आलेली उखाणा स्पर्धा रंगतदार ठरली. त्यात मधुरा सावंत, अनुजा पिंपळखरे, संध्या देशमुख, शुभांगी भोसले आणि मीनल घोडके विजेते ठरले. तर, वृंदा राऊत यांना उत्तेजनार्थ पारितोषिकाने गौरविण्यात आले. पद्मा साठे आणि सुनिता मोराणकर यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

या कार्यक्रमाप्रसंगी सुभेदारवाडा कट्ट्याचे खजिनदार अर्जुन पाटील, सदस्य संजय पांडे, कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्षा हेमालता पवार व इतर सदस्या,तसेच दी महिला सहकारी उद्योग मंदिर मर्यादित कल्याण या संस्थेच्या अध्यक्षा मेधा आघारकर आणि त्यांचे पदाधिकारी उपस्थित होत्या.

## खरोशी परिसरात गौराई आणि पाच दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन







दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर, गणपती चालले गावाला चैन पडेना आम्हाला या जयघोषात वाजत गाजत गुलाल बुक्का फुले उधळत भजन म्हणत गौराई आणि पाच दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन खरोशी परिसरातील ५० ते ६० गावातील गणपती बाप्पा व गौराई मातेचे मोठ्या आनंदात आणि उत्साहाच्या वातावरणात तसेच परंपरा व संस्कृती राखत डोक्यावर बाप्पाला व गौराई ला घेऊन मनोभावे निरोप दिला.यावेळी कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठिकठिकाणी चोख पोलिस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता. तालुक्यातील बाळगंगा पाताळगंगा या नदीच्या पात्रात खाडीकिनारी तलावात खरोशी दूरशेत जिते खारपाडा दुष्मी बळवली हनुमानपाडा जोहे कोपर डावरे दादर तांबडशेत यासह अनेक गावातील गणपती बाप्पाचे प्रत्येक विसर्जन घाटावर योग्य ती उपाययोजना देखील करण्यात आली होती. बाप्पांना गणेशभक्तांनी भावपूर्ण निरोप दिला. पेण तालुक्यातून ११ सार्वजनिक, ९ हजार २५ खाजगी बाप्पांचे आज विसर्जन करण्यात आले तर दोन हजारहून अधिक गौराईंचे देखील आज विसर्जन करण्यात आले.

## पडघ्यात गौरी गणपतींचे विसर्जन ; ग्रामपंचायतीकडुन चोख व्यवस्था

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे सजविलेल्या गाड्यामधुन गौरीसह, गणपंतीचे उत्साहात विसर्जन करण्यात आले.

"गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या गौरी माते की जय" अशा घोषणा देत सात दिवस वास्तव्य असलेल्या गणपतींचे व तिन दीवस वास्तव्य असलेल्या गौरीचें साश्रु नयनांनी मंगळवारी उत्साहात विसर्जन करण्यात आले. यावेळी पारंपारिक वेशभूषेत सजविलेल्या चारचाकी, टेम्पो, ऑंटोरिक्षा, हातगाडीमधुन





पडघा येथील ओहळ व कुंभेरी नदीवरील गणेश घाटावर नागरीकांनी गणपती व महीलांनी पारंपारिक वेशभूषेत सजविलेल्या टोपलीमधुन आणलेल्या गवताच्या गौरीचें उत्साहात विसर्जन केले. दोन्ही गणेश घाटावर सरपंच रविंद्र विशे व ग्रामपंचायत कमीटी यांच्या मार्गदर्शनाखाली पिण्याच्या पाण्यासह, मंडप, आरती टेबल, लाईट व्यवस्था करण्यात आली होती, यावेळी उपसरपंच मयुरेश गंधे माजी सरपंच व विद्यमान सदस्य शैलेश बिडवी, अभिषेक नागावेकर, माजी सरपंच संजय जाधव, अविनाश दास, राजेश साळुंखे उपस्थित. यावेळी ३०० गणपती व १०० गौरीचें विसर्जन करण्यात तर विसर्जन स्थळी राकेश तेलवणे, दिपक कांबळे, श्रीकांत पांडव, प्रतिक शेट्टी, दिपक थोरे, रवि तांबे, शाम जाधव या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहुन विविध व्यवस्था चोख ठेवण्यासाठी मेहनत घेतली. तर कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पडघा पोलीस ठाण्याच्या वतीने ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## पांढरीचा राजा गणेशोत्सव मंडळाचा महिलांसाठी पैठणीचा खेळ

- विजेत्या महिलांचा मानाच्या पैठणीने सन्मान
- महिलांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा पैठणीचा उपक्रम कौतुकास्पद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : जय बजरंग प्रतिष्ठान आयोजित पांढरीचा राजा गणेश उत्सव मंडळात मंगळवार, दि. २ सप्टेंबर रोजी महिलांसाठी आयोजित "होम मिनिस्टर खेळ पैठणीचा" कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गणेशोत्सवाच्या पारंपरिक सोहळयात महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने घेतलेला हा उपक्रम यशस्वी ठरला. हसत-खेळत, आनंदाने सहभागी झालेल्या महिलांमुळे मंडपात एक वेगळीच रंगत निर्माण झाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रज्ञा विनायक तांबे यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी उद्घाटनवेळी आपल्या मनोगतात प्रज्ञा तांबे यांनी महिलांना व्यासपीठ मिळवून देणाऱ्या या उपक्रमाचे महत्व अधोरेखित करत म्हटले की, हा कार्यक्रम केवळ करमणुकीपुरता नसून महिलांच्या आत्मविश्वासाला बळ देणारा आहे. त्यानुसार, महिलांचा आनंद, उत्साह आणि एकतेचा भाव उत्सव अधिक अर्थपूर्ण बनवतो.

या कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते, ज्यात ज्येष्ठ उद्योजिका




शालिनीताई ढोबळे, अपूर्वा तांबे, मंगल शेटे, ग्रामविकास मंडळाचे उपाध्यक्ष रघुनाथ तांबे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल डुंबरे, सचिव हेमंत पा. डुंबरे, ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष दत्तात्रय डुंबरे, तंटामुक्तीचे उपाध्यक्ष मयुर मालकर, किरण गाढवे, उद्योजक सिद्धार्थ तांबे, अक्षय तांबे, राजेंद्र हांडे देखमुख, सतीश तांबे, भाऊसाहेब खाडे, दिलीप शेटे तसेच पुरुष,महिला,तरुण तरुणी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


कार्यक्रमात विजेत्या महिला जानकी बोऱ्हाडे, भाग्यश्री भोकरे आणि रोहिणी भोकरे यांना "मानाची पैठणी" देऊन सन्मानित करण्यात आले. या सन्मान सोहळयासाठी शुभम साडी सेंटरचे राजेंद्र ढोबळे, डी.बी. कलेक्शनचे अजित कर्डिले आणि जय बलाजी कलेक्शनचे जयवंत डुंबरे यांनी मानाच्या पैठणीच्या बक्षिस दिले सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण घालून दिले.

टीव्ही अभिनेता व दिग्दर्शक प्रशांत शेटे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून त्यात उत्साह आणि रंगत आणली. महिलांना व्यासपीठ देणारा हा उपक्रम समाजात एकतेची भावना वाढवणारा ठरला. हा खेळ सहभागी महिलांसाठी अविस्मरणीय ठरला असून पुढील काळात अशा उपक्रमांची उत्सुकता कायम राहील, असे आयोजकांनी सांगितले.

## भिवंडी महापालिका प्रभाग रचना जाहीर

● प्रभाग संख्या २३ ● सदस्य संख्या ९०

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : सार्वजनिक गणेशोत्सवाची धुमशान सुरू असतानाच इच्छुक उमेदवार व राजकीय पक्षांचे लक्ष लागलेल्या भिवंडी महानगरपालिकेचा निवडणूक विभागाकडून प्रभाग रचना आज जाहीर करण्यात आली आहे त्यामुळे राजकीय पक्ष व इच्छुक उमेदवारांनी समाधान व्यक्त करीत अधिक माहिती घेण्यासाठी पालिकेच्या संबंधित विभाग अधिकाऱ्याशी संपर्क साधून चर्चा करू लागले आहेत.

महाराष्ट्रात गेल्या 5 वर्षांपासून महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका न झाल्याने सर्वच राजकीय पक्षांचा जीव टांगणीला लागला आहे. शासनाने प्रभाग रचना जाहीर करण्याचे सुचना देऊन हरकती मागविण्याचे निर्देश दिले आहेत त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजायला सुरवात झाली आहे.भिवंडीत अनेक राजकीय पक्षांचे इच्छुक उमेदवारांनी आपाआपल्या प्रभागात मोर्चेबांधणी सुध्दा गणेशोत्सवाचा अनुषंगाने सुरू केली आहे.

असे असतानाच आज भिवंडी महापालिका निवडणूक विभागाकडून प्रभाग रचना बनविण्यात आली असुन त्यांनी जाहिर केली आहे.

भिवंडी शहर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २०११ मधील लोकसंख्या लक्षात घेऊन २०१७ मधील प्रभाग रचना कायम ठेवत ९० सदस्यां साठी २३ प्रभाग रचना बनविण्यात आली आहे.३ सप्टेंबर रोजी आयुक्तांच्या मान्यतेने पालिकेचे सहाय्यक आयुक्त ( निवडणूक ) नितीन पाटील यांनी प्रभाग रचना प्रारूप प्रसिद्ध केली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार ७ लाख ९ हजार ६६५ इतकी लोकसंख्या प्रमाण मानून ही प्रभाग रचना बनविण्यात आली आहे. एकूण २३ प्रभाग असून त्यापैकी २१ प्रभाग हे चार सदस्यीय तर २ प्रभाग हे तीन सदस्यीय असणार आहेत. यामध्ये प्रभाग क्रमांक १७ मध्ये ३४,४७४ एवढी सर्वाधिक लोकसंख्या आहे तर प्रभाग क्रमांक १५ मध्ये २५९१९ इतकी सर्वाधिक कमी लोकसंख्या असणार आहे. या प्रभाग प्रारूप रचने संदर्भात कोणाला हरकत असल्यास त्यांनी १५ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता पर्यंत आपल्या हरकती नोंदवाव्यात.हरकती व सूचना नोंदविणाऱ्यांना स्वतंत्र पणे कळविण्यात येणार असल्याचे महापालिका प्रशासनाने कळविले आहे.

प्रभाग रचना बनविताना तीन सदस्यीय प्रभाग रचनेसाठी २३६५६ तर चार सदस्यीय प्रभाग रचनेसाठी ३१५४१ इतकी सरासरी लोकसंख्या प्रमाण मानण्यात आली आहे.तर २०११ च्या जनगणने नुसार शहरात अनुसूचित जातीची २१८२० तर अनुसूचित जमातीची ८१७८ एवढी लोकसंख्या नमूद आहे.




## वाडा-शिरीष फाटा मार्ग धोकादायक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : उपाययोजनांच्या अभावामुळे वाडा शिरीष फाटा हा चार किमी महामार्ग वाहतुकीसाठी धोकादायक झाला आहे.

वाडा-भिवंडी या ४० किमीच्या मार्गाचे काँक्रीटीकरण काम घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत हे काम निधी अभावी सुरू झालेले नाही. अनेक ठिकाणी कंत्राटदाराने खोदकाम केले आहे. साहित्य बाजूला न केल्याने पावसाळ्यात चिखल झाला आहे. वाडा-शिरीष फाटा या चार किमी अंतराचे कॉंक्रीटीकरणाचे एका बाजूचे काम पूर्ण झाल्याने मागील दीड महिन्यांपूर्वी हा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. दुसऱ्या बाजूची अवस्था अत्यंत बिकट झाल्यामुळे त्या बाजूची वाहतूक बंद करण्यात आल्यामुळे एकेरी मार्गावरूनच दोन्ही बाजूची वाहतूक सुरू करण्यात आली आहे. वाहतूक सुरू केलेल्या कॉंक्रिटीकरण मार्गावर कंत्राटदाराचे व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष



असल्याचे पहावयास दिसून येत आहे. हा रस्ता वाहतुकीसाठी खुला केल्यानंतर ठेकेदाराकडून दिशादर्शक फलक किंवा सुरक्षितेसाठी आवश्यक उपाययोजना नाहीत. रात्रीच्या वेळी हा रस्ता दुचाकी, चारचाकी वाहन चालकांसाठी धोकादायक आहे. हा रस्ता आधीच तीन ते चार मी. फूट उंचीचा आहे. तर दुसऱ्या बाजूचा वाहतुकीसाठी बंद केलेला मार्ग हा खाली गेला आहे. त्यामुळे असमान उंचीने वाहने एका बाजूने जाताना ती खाली असलेल्या मार्गाखाली सरकत जात आहेत. वाहन चालकांना रस्त्याच्या बाजूचा अंदाज येत नाही. आता पाऊस सुरू असल्याने पावसात रस्त्यावरचे काहीएक दिसत नाही. रस्त्यावर इंडिकेटर किंवा सुरक्षितेच्या पट्ट्या, बॅरीगेट्स किंवा उपाययोजना केलेल्या नाहीत.

सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदाराला वारंवार सूचना देण्यात आले असल्याचे सांगितले आहे. मात्र तरीही कंत्राटदाराकडून सुरक्षितेच्या उपाययोजना करण्यात येत नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदारावर कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024